# प्रेसनोट दि. ०६/०५/२०१९

**दि. २८/०४/२०१९ ते ०४/०५/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये ८२,५३९/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.**

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्धारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर क्राईम पोलीस स्टेशन मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्धारे सदर बँकला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्धारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे एका अर्जात अर्जदार संजय हराळे यांच्या क्रेडीट कार्डवरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्याची २३,२७९/- रुपयाची आर्थिक फसवणुक केली होती. सदर बाबत तात्काळ सिटी बँकेशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे कल्पेश देवकाते हे ऑनलाईन अफ्रिकन पक्षी खरेदी करीत असताना अज्ञात इसमाने त्याच्या अकाउंटवर २२,०००/- रुपये भरायला लावुन त्याची फसवणुक केली होती. सदर बाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार शिरीन मुबीन खान यांचे डेबीट कार्ड त्यांचेजवळ असताना त्याच्या डेबीट कार्डवर अनधिकृत ट्रॅन्झॅक्शन होवुन त्याची ३०,२६०/- रुपयांची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन ॲक्सिस बँकेकडुन अर्जदार यांना संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आले. तसेच अर्जदार नामे रोहित श्रॉफ यांनी जिवनसाथी या मॅट्रोमनी साईटवरील इसमाने लग्नासाठी रजिस्ट्रेशन केले होते परंतु लॉगइन आयडी व रजिस्ट्रेशन पावती चुकीची देवुन याची ३,०००/- रुपयाची आर्थिक आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेले संपुर्ण रक्कम रुपये रिफंड करण्यात आली. अशाच प्रकारच्या दुस-या अर्जात अर्जदार नामे शेख रशीद सकाळ पेपरमध्ये स्वयंवर मॅरेज ब्युरोची जाहिरात पाहुन नोदंणीसाठी पैसे भरले परंतु त्याची लग्नाचे आमीषाने ४,०००/- रु. भरावयास लावुन त्यांना कोणतीही मुलगी न दाखविता त्याची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम गैरअर्जदार यांचेकडुन रिफंड करण्यात आली. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर

ORL RSD